<table>
<tr>
<td><u>नियमित दिवाणी दावा क्र. १०१५/२०२३ मधील</u><br><u>निशाणी क्र. २६ खालील आदेश</u><br><u>रेखा उर्फ कुसुमबाई गोरे  विरुध्द छाया घोरपडे</u></td>
<td>MHAH140014252023</td>
</tr>
</table>

सदरचा अर्ज प्रतिवादी क्र.१ व ४ यांच्याविरुध्द झालेला विनाकैफीयत आदेश रद्द करुन कैफियत दाखल करण्यास परवानगी मिळणेबाबत दाखल केला आहे. प्रस्तुत अर्जासोबत प्रतिवादीचे शपथपत्र जोडलेले आहे.

२. प्रतिवादीने सदर अर्जात कथन केले आहे की, प्रतिवादी यांना मुदतीत आवश्यक कागदपत्रे उपलब्ध न झाल्याने तसेच, प्रतिवादी यांना कायदयाचे ज्ञान नसल्याने ते मुदतीत कैफियत दाखल करु शकले नाही. त्यामुळे त्यांच्याविरुध्द विनाकैफियत आदेश पारीत करण्यात आला. सबब, प्रतिवादींविरुध्द झालेला विनाकैफियत आदेश रद्द करुन कैफियत दाखल करणेस परवानगी मिळावी.

३. वादीने सदर अर्जावर म्हणणे दाखल करुन कथन केले आहे की, प्रस्तुतचा अर्ज खोटा आहे. दाव्याचे कामकाज लांबविण्यासाठी अर्ज दिलेला आहे. प्रतिवादीं यांना दाव्यांसदर्भात माहिती मिळुन देखील त्यांनी मुद्दामहुन उशिर केलेला आहे. प्रतिवादींचा अर्ज रद्द करण्यात यावाा. मंजुर केल्यास त्याकरीता प्रतिवादींना दंड आकारण्यात यावा.

४. सदरचा अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. प्रतिवादींने प्रस्तुत अर्जात कागदपत्र व माहिती न मिळाल्याने मुदतीत कैफियत दाखल करता आली नाही असे कारण नमुद केले

आहे. परंतु, सदर कारणाच्या पुष्टयर्थ कोणताही कागदोपत्री पुरावा दिलेला नाही. असे असले तरी देखील प्रस्तुत दावा हा वाटप व निरंतर मनाई हुकुमासाठी दाखल केला आहे. त्यामुळे दावा पुर्णतः निकाली काढणेकरीता दोन्ही बाजुंचे म्हणणे व पुरावा अभिलेखावर असणे आवश्यक आहे. तसेच नैसर्गिक न्यायतत्वानुसार प्रतिवादींना त्यांचे म्हणणे दाखल करण्यास परवानगी देणे योग्य ठरेल. म्हणुन खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. प्रतिवादी क्र.१ व ४ यांच्या विरुध्द झालेला विनाकैफियत आदेश दंडासह रद्द करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.१ व ४ यांनी वादीला दंडापोटी रक्कम रुपये ५००/-(रक्कम रुपये पाचशे फक्त) दयावेत. तद्नंतर प्रतिवादी क्र.१ व ४ यांची कैफियत अभिलेखावर घेण्यात येईल.

SANDHYA YUVRAJ SUL

Digitally signed by SANDHYA YUVRAJ SUL
Date: 2025.03.11 18:25:36 +0530

**(संध्या यु. सुळ)**

२ रे सह दिवाणी न्यायाधीश,
क.स्तर, नेवासा

ठिकाण– नेवासा
दिनांक – १०/०३/२०२५